## "कलम १९ अधिसूचना"

क्र.वशि/क.लि/उपजि.भू सं.लसिंका/ २५५ /२०१६
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),(ल.सिं.का)
जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा
दिनांक :- १० / ०६ /२०१६

क्रमांक : भूसंपादन प्रकरण क्रमांक २०/२०१२-१३ मौजे काळेगांव ता. खामगांव जि. बुलडाणा

ज्याअर्थी, समुचित शासन असलेल्या बुलडाणा जिल्हयाच्या जिल्हाधिका-याने, भूमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्स्थापना करताना वाजवी भरपाई मिळण्याचा व पारदर्शकतेचा हक्क अधिनियम,२०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा केला आहे) यांच्या कलम ११ च्या पोटकलम(१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन, अधिसूचना, क्रमांक २२६ दिनांक १७.०८.२०१५ अन्वये प्रारंभिक अधिसूचना काढली आहे आणि त्याव्दारे असे अधिसूचित केले आहे की, यासोबत जोडलेल्या अनुसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, बुलडाणा (जिल्हयाच्या) जिल्हाधिका-याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल, कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमीन संपादित करण्याची आवश्यकता आहे याबाबत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदींन्वये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे;

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी "पुनर्वसाहत क्षेत्र" म्हणून निर्धारीत केले असल्याचे याव्दारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड(छ) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिका-यांची कार्ये पार पाडण्यासाठी उपजिल्हाधिकारी (भूसंपादन) (ल.सिं.का) बुलडाणा, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा यास पदनिर्देशित करीत आहे.

### अनुसूची - १
संपादित करावयाच्या जमिनीचे वर्णन
गाव : काळेगांव तालूका : खामगांव जिल्हा : बुलडाणा
भूसंपादन प्रकरण क्रमांक २०/२०१२-१३

| अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) | अनुक्रमांक | भूमापन किंवा गट क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|---|---|
| १ | १२७ | ०.०४ | ५ | १४१ | ०.६१ |
| २ | १२९ | ०.६२ | ६ | १४१ | ०.७३ |
| ३ | १२८ | ०.१२ | ७ | १४१ | ०.६५ |
| ४ | ६७ | ०.१५ | ८ | १४१ | १.०६ |
| | एकूण | | | | ३.९८ हे.आर |
| | संपादनाचे प्रयोजन :- निम्न् ज्ञानगंगा-II बृ.ल.पा. प्रकल्पाचे सांडव्याच्या पुच्छ कालव्याचे बांधकामाकरिता | | | | |

अनुसूची - २

सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण

प्रकल्पाचे नांव - निम्न् ज्ञानगंगा-II बृ.ल.पा. योजना

प्रकल्पकार्याचे वर्णन - निम्न् ज्ञानगंगा-II बृ.ल.पा. प्रकल्पाचे सांडव्याच्या पुच्छ कालव्याचे बांधकामाकरिता

समाजाला मिळणारे लाभ - पाझर तलावामुळे अप्रत्यक्ष सिंचनाचा फायदा होत असून सार्वजनिक हितासाठी शेतातील विहीरींची पाण्याची पातळी वाढ, सिंचन सुविधा, मत्सव्यवसाय, गुरे ढोरांना पिण्याकरीता पाणी, इत्यादी ग्रामीण पायाभूत सुविधांचा लाभ होईल.

अनुसूची - ३

पुनर्वसाहत क्षेत्राचे वर्णन

गाव : काळेगांव, तालुका : खामगांव, जिल्हा : बुलडाणा

| अनुक्रमांक | भूमापन क्रमांक किंवा सर्व्हे क्रमांक | अंदाजित क्षेत्र (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|
| | निरंक | |

अनुसूची - ४

(पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश)

निरंक

टिप :- उक्त जमिनीच्या नकाशाचे उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),(ल.सिं.का) जिल्हाधिकारी कार्यालय, बुलडाणा कार्यालयामध्ये निरीक्षण करता येईल.

दिनांक : / /२०१६

ठिकाण : बुलडाणा.

16-3-2016

(एस.ए. खांदे)
उपजिल्हाधिकारी (भूसंपादन),
(ल.सिं.का) बुलडाणा

( विजय झाडे)
जिल्हाधिकारी बुलडाणा.